## धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये जनतेच्या सहभागासाठी केलेली उपाययोजना

### मच्छिमार ओळखपत्र

महाराष्ट्र राज्याला ७२० कि. मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्र किनारा लाभला असुन मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे सागरी जिल्हे आहेत. सागरी किनारपट्टीत मासेमारीवर उपजिविका करणारे पारंपारीक मच्छिमारांची संस्था आहे. त्यांचा मुख्य व्यवसाय सागरी मासेमारी हा आहे. सागरी मासेमारी प्रामुख्याने यांत्रिकी व बिगर यात्रिकी नौका व्दारे करण्यात येते सांख्यिकी विभागाच्या मत्स्यगणनेनुसार किनापट्टीवर ४३१ मच्छिमार गावे ५३००७ मच्छिमार कुटुंबे ६७२९० प्रत्यक्ष मासेमारी करणारे मच्छिमार ५७०८७ व्यवसायात गुंतलेले इतर मच्छिमार १३१०५ यांत्रिकी नौका ६२४५ बिगर यांत्रिक असे एकुण १९३५० मासेमारी नौका आहेत. त्याच प्रमाणे कोकण विभागात १ राज्य सघ ५ जिल्हा संघ १ तालुका संघ व २४७ प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्था आहेत.

राष्ट्रीय सुरक्षेतेच्या दृष्टीने समुद्रात मासेमारी साठी जाणाऱ्या मच्छिमारांना ओळख पत्रे आवश्यक या निर्णयाच्या अनुषंगाने विभागामार्फत मच्छिमारांना ओळखपत्रे देण्याची कार्यवाही चालु आहे. माहे मे २००९ अखेर जिल्हा कार्यालयांना एकुण ६९५०४ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी एकुण ४०२४८ ओळखपत्रे मच्छिमारांना वाटप करण्यात आलेली आहेत. उर्वरित पात्र अर्जावर कार्यवाही सुरु आहे.

दि. २६ मार्च २००९ रोजी नवी दिल्ली येथील बैठकीत राज्यातील मच्छिमारांना वाटप करावयाच्या ओळखपत्राकरीता आवश्यक माहिती गोळा करण्याकरीता संकलन नमुना तयार करण्यात आला.

राज्यातील मच्छिमारांना ओळखपत्रे देण्याच्या संदर्भात केंद्र शासनाकडुन प्राप्त झालेला विहित नमुन्यातील अर्ज व ते संकलन करण्याकरीता शासन पत्र क्र. मत्स्यवि / २००९ / ३५२ / प्र. क्र. ५७ / पदुम - १४, दि. २७ एप्रिल २००९ अन्वये देण्यात आलेल्या सुचनानुसार कोकण विभागातील मच्छिमारांना ओळखपत्रे देण्याच्या दृष्टीने वैयक्तिक मच्छिमारांची माहिती संकलित करण्याकरीता दि. २ मे २००९ रोजी प्रत्यक्ष हस्तांतरण करुन संकलन करण्याच्या दृष्टीने आवश्यक काग्रवाही करण्याचे निर्देश सर्व सहाय्यक आयुक्तांना देण्यात आले आहेत. ओळखपत्रे देण्याकरीता विहित प्रपत्रात माहिती संकलन जिल्हास्तरावर करण्यात येते.